शिरूर येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे न्यायमूर्तीच्या हस्ते उद्घाटन

न्यायालयाची नूतन इमारत व सोयी सुविधा या पक्षकारांसाठी–न्यायमूर्ती रविंद्र जोशी

बीड, (प्रतिनिधी) :– शिरूर येथील दिवाणी व फौजदारी – न्यायालयाच्या नूतन वास्तूचा उदघाटन समारंभ माननीय न्यायमूर्ती राजेंद्र गोविंद अवचट, उच्च न्यायालय मुंबई तथा वरिष्ठ पालक न्यायमूर्ती बीड न्यायिक जिल्हा यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमास माननीय न्यायमूर्ती श्री. रविंद्र मधुसूदन जोशी, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती बीड न्यायिक जिल्हा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.श्री. आनंद लक्ष्मीचंद यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड हे उपस्थित होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.श्री. आनंद लक्ष्मीचंद यावलकर,,कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत न्यायालयाच्या नूतन इमारतीमध्ये असणा–या सोयी–सुविधांबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये ई–सेवा केंद्र, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा, जनरेटर सुविधा, महिला व पुरुष विभिन्न यांचेकरिता स्वतंत्र बारूम्स इत्यादी सुविधांबाबत माहिती दिली.

शिरूर तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.बी. बी. जायभाये यांनी आपल्या भाषणामध्ये शिरूर न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत आलेल्या अडचणींची विस्तृतपणे माहिती देवून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कशा प्रकारे प्रयत्न करण्यात आले या बाबत सविस्तरपणे माहिती दिली. त्यानंतर मा.न्यायमूर्ती श्री. विश्वासराव काशिनाथराव जाधव, निवृत्त न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई तथा सदस्य महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ औरंगाबाद यांनी

उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले, यामध्ये न्यायालयाच्या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार समारंभ करण्यात यावेत व पारंपारिक प्रथेला फाटा देवून घटनेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात यावे असे सुचविले. कार्यक्रमाने प्रमुख अतिथी मा.श्री. रविंद्र मधुसूदन जोशी, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती, बीड न्यायिक जिल्हा यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की, नूतन सुसज्ज व भव्यदिव्य न्यायालयाची इमारत ही पक्षकारांसाठी आहे व सदर इमारतीचे स्वच्छतेबाबत सर्वांनी दक्षता घेणे अत्यंत जरुरी आहे. न्यायप्रक्रियेमध्ये वकिलांचा फार महत्वाचा भाग आहे व न्यायप्रक्रिया ही पक्षकारांसाठी आहे व मला या गोष्टीचा आनंद आहे. हे जनतेच व कायदयाचे राज्य असुन ते संविधानाप्रमाणे चालणार आहे असे मौलिक मार्गदर्शन त्यांनी आपल्या भाषणामध्ये केले. सदर कार्यक्रमास आष्टी–पाटोदा–शिरूर मतदार संघाचे आमदार श्री. बाळासाहेब आजबे हे कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. तसेच त्यानंतर सदर इमारतीस आ. सुरेश धस यांनी भेट दिली. तसेच सदर कार्यक्रमास बीड, गेवराई, आष्टी, पाटोदा येथील न्यायिक अधिकारी, तसेच बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष श्री.पी. एस. राजापूरकर, सचिव श्री.ई.जी. काकडे व इतर पदाधिकारी व विभिन्न उपस्थित होते. तसेच पाटोदा, केज, आष्टी, गेवराई येथील तालुका वकील संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी व बहुतांश विभिन्न उपस्थित होते. तसेच शिरूर तालुक्यातील ग्रामस्थ, पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिरूर वकील संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी, विभिन्न तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग बीड कमांक २ चे कार्यकारी अभियंता श्री. मार्कडे, शिरूर येथील उपविभागीय अभियंता, गटविकास अधिकारी पंचायत समिती, तहसीलदार शिरूर, सरपंच ग्रामपंचायत वारणी, नगराध्यक्ष शिरूर कासार, उपकार्यकारी अभियंता महावितरण यांनी परिश्रम घेतले. तसेच सदर इमारतीचे बांगल्या पध्दतीने बांधकाम केल्याबद्दल सिताई कन्स्टरशनचे श्री. शाम क्षीरसागर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मा.श्री.एस.टी. सहारे, सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड व मा.श्रीमती पी.जी. इनामदार, दिवाणी न्यायाधीश क.स्तर आष्टी यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिरूर कासार न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश श्री. अमितकुमार मनगिरे यांनी केले. आज शिरूर न्यायालयाच्या नूतन इमारतीचा उदघाटन सोहळा मान्यवरांच्या हस्ते फीत कापून संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरूवात शिरूर येथील आवडिवल इंग्लीश स्कूलच्या विदयार्थ्यांच्या स्वागत गीत गायनाने झाली. तद्नंत व्यासपीठावर ठेवण्यात आलेल्या रोपटयांना मान्यवरांच्या हस्ते पाणी देवून कार्यक्रमाची सुरूवात झाली त्यानंतर मान्यवरांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. शेवटी कार्यक्रमाची सांगता पोलिस बॅन्ड पथकाच्या राष्ट्रगीताने झाली.

मोमीनपुरा व्यापारी संघटनेचे संस्थापक शमशुमामू देवलेकर यांचे निधन

बीड, (प्रतिनिधी):– येथील मोमीनपुरा परिसरातील जेष्ठ समाजसेवक तथा कापड व्यापारी संघटनेचे संस्थापक शमशू मामू देवलकर यांचे काल दिनांक १८ मार्च रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे २०२० च्या कोरोना महामारीत त्यांनी हजारो लोकांना संघटनेच्या माध्यमातून राशन किट वाटप केले होते सतत दुसऱ्यांच्या दुःखात धावून जाणारे शमशूमामु देवलेकर यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे नातेवाईकांसह व्यापारी संघटनावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे शमशू मामू देवलेकर यांची ५००० हजार लोकांच्या उपस्थितीत मदिना मस्जिद समोर जनाजा नमाज अदा करून चार बावडी कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला त्यांच्या पश्चात दोन मुली दोन मुलं व पत्नी असा परिवार आहे.

कै.बि.दे.राठी राजस्थानी शाळेत बक्षीस वितरण सोहळा संपन्न

बीड (प्रतिनिधी): राजस्थानी सेवा समाज संचलित कै.बि.दे. राठी राजस्थानी विद्यालयात क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव श्री. रामेश्वर जी कासट साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे ज्येष्ठ संचालक अशोक जी मंत्री साहेब हे होते. तसेच बक्षीस वितरणाचे प्रायोजक श्री निलेशजी संचेती हे कार्यक्रमास उपस्थित होते.

वायवेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री महेश पारीख सर यांनी केले. यावेळी क्रीडा स्पर्धेत घेण्यात आलेल्या सांघिक खेळ खो–खो, लंगडी, रस्सीखेच तर वैयक्तिक खेळात संगीत खुर्ची, दोरीवरील उड्या या स्पर्धांच्या बक्षिसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे सचिव श्री रामेश्वर जी कासट साहेब यांनी आपल्या विद्यालयात होत असलेल्या सर्व उपक्रमाबद्दल समाधान आणि आनंद व्यक्त केला. व संस्थेचे जेष्ठ संचालक श्री अशोक जी करवा साहेब यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. कार्यक्रमाचे संचलन सौ. धारूरकर मॅडम यांनी केले तर बक्षीस वाचन सौ. राठीकर मॅडम व आभार सौ. ढेपे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पारीख सर क्रीडा विभाग प्रमुख श्री डावकर सर तसेच सर्व सहकारी शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

बीडः– शहरातील संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या विविध विकास कामासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी राज्य शासनाकडून एक कोटी रुपये निधी मंजूर करून घेतल्याबद्दल सोमवारी प्रतिष्ठानच्या विश्वस्तांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा सत्कार करून आभार मानले.

पंकजाताईंचा २२ मार्चपासून बीड जिल्ह्यात झंझावात

मोहटा देवी, नारायण गड, गहिनीनाथगड, भगवान भक्ती गडावर जाऊन घेणार दर्शन

बीड (प्रतिनिधी) ; बीड लोकसभेची निवडणूक तोंडावर आहे, ही निवडणूक लढविण्यासाठी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे ह्या ताकतीने मैदानात उतरल्या आहेत. त्याअनुषंगाने ताईंचा येत्या २२ मार्चपासून बीड जिल्ह्यात झंझावत पहायला मिळणार आहे. या दौर्‌याच्या निमित्ताने त्या दर्शनासाठी पाथर्डी येथील श्री. श्रेत्र मोहटा देवी तर जिल्ह्यातील नारायण गड, गहिनीनाथ गड आणि भगवान भक्ती गडावरही जाणार आहेत. याबरोबरच त्या या दौर्‌यात अनेकांच्या गाठीभेटीही घेणार आहेत.

बीड जिल्ह्याला पुढे घेवून जाण्याच्या अनुषंगाने भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी सातत्याने काम केलेले आहे. बीड जिल्ह्यात तर त्यांनी २५ हजार कोटींहून अधिक निधी खेचून आणत जिल्ह्यात विकासाची गंगाच आणलेली आहे, आता याच कामाची पावती म्हणून त्यांच्या पाठीशी संपूर्ण बीड जिल्हा उभा राहत असल्याचे पहायला मिळणार आहे. त्या स्वतः लोकसभेच्या निवडणूकीत उमेदवार आहेत. याअनुषंगानेच त्यांनी आपल्या प्रचारालाही सुरवात केली आहे, २२ मार्च पासून त्या बीड जिल्ह्यात दौरा करणार आहेत. त्यानुसार २१ मार्च रोजी दुपारी एक वाजता मुंबई येथून कारने पुण्याकडे त्या रवाना होणार आहेत. सायंकाळी चार वाजता पुणे येथे अगमन, सायंकाळी साडे पाच वाजता पुणे येथून कारने अहिल्या नगरकडे रवाना, रात्री साडे आठ वाजता अहिल्या नगर येथे आगमन, २२ मार्च रोजी सकाळी आठ वाजता अहिल्यानगरहून पांगरमलकडे रवाना, पावणे नऊ वाजता पांगरमल येथे नाळळी समाहाच्या डोंडा पुजनास उपस्थिती, सव्वा नऊ वाजता पांगरमलहून श्री. श्रेत्र मोहटा देवी (ता.पाथर्डी) कडे रवाना, सकाळी साडे आकरा वाजता श्री श्रेत्र मोहटा देवी येथे आगमन व दर्शन, दुपारी १२.१५ धामणगाव (ता.आष्टी) कडे रवाना, दुपारी एक वाजता धामणगाव येथे आगमन व बीडच्या जिल्ह्याच्या वतीने स्वागत, दुपारी दोन वाजता धामणगाव येथून कारने आष्टीकडे रवाना, दुपारी तीन वाजता आष्टी, पावणे पाच वाजता गहिनीनाथ गडाचे दर्शन, साडे पाच वाजता भगवान भक्ती गडावर जावून त्या दर्शन घेणार आहेत. रात्री आठ वाजता त्यांचे बीडमध्ये आगमन होणार आहे. तर २३ मार्च रोजी सकाळी सव्वा नऊ वाजता नारायणगडावर जावून त्या दर्शन घेणार आहेत. त्यानंतर पावणे बारा वाजता बीडमध्ये माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट, दुपारी सव्वा बारा वाजता गेवराईत माजी आ. बदामराव पंडित यांच्या तर दुपारी सव्वा एक वाजता आ. लक्ष्मण पवार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट त्या देणार आहेत. त्यानंतर त्या बीडमध्ये परत येणार असून त्या दैनिकांना भेटी देणार आहेत. तर २४ मार्च रोजी दुपारी बारा वाजता त्या कौठळी तांडा (ता.परळी) येथे जावून बंजारा समाज बांधवांसोबत होळी साजरी करणार आहेत.

संशोधनामध्ये संख्येपेक्षा गुणवत्ता महत्त्वाची - प्रो.डॉ.बी.सुधाकर रेड्डी

सिरसाळा (प्रतिनिधी);– श्री पंडितगुरु पाडींकर महाविद्यालय सिरसाळा ता.परळी वैजनाथ जि.बीड अर्थशास्त्र विभाग व भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमानाने भारतातील मानव विकास निर्देशांकांची सद्यस्थिती विशेष संदर्भ मराठवाडा विभाग या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र दिनांक १३ मार्च २०२४ रोजी बुधवार महाविद्यालयात आयोजित करण्यात आले. या राष्ट्रीय चर्चासत्राचे मार्गदर्शक प्रोफेसर

डॉ.बी. सुधाकर रेड्डी (संचालक दक्षिण प्रादेशिक केंद्र आय सी एस एस आर हैदराबाद) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते तर त्या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. किशोर कदम(प्रोफेसर, एस.एन. डी. टी. विद्यापीठ मुंबई) हे होते. संशोधन मध्ये संख्या पेक्षा गुणवत्ता महत्त्वाची आहे त्याच बरोबर संशोधन हे उदात हेतूने केले गेले पाहिजे असे त्यांनी उद्गार काढले. आय सी एस एस आर चे फंड कशा पद्धतीने मिळवता येतील ते त्यांनी तेथील प्राध्यापक व संशोधन विद्यार्थी यांना समजावून सांगितले जगात मानव विकास निर्देशांक यावर मोठ्या प्रमाणावर काम चालू आहे. विकासाच्या प्रक्रिनेत महिलांचा सहभाग वाढला पाहिजे महिलांना विकसापासून दूर ठेवून मानव विकास शक्य नाही .अध्यक्षीय समारोप करताना प्रा.डॉ. किशोर कदम यांनी प्रतिपादन केले.भारत देशामध्ये जिल्हा स्तरावर मानवी विकास निर्देशांक काढण्यावर भर देत आहे .त्यानंतर काही संशोधन पेपरचे वाचन करण्यात आले .त्या सत्राचे आभार प्रा.डॉ.उषा माने यांनी केले. व त्यानंतर लगलीच समारोप सत्र घेण्यात आले त्या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून मा.सचिव (रामेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ)प्रा.योगेशजी कदम हे होते अंजली लाड यांना संशोधन विद्यार्थ्यांचा बेस्ट पेपरचे बक्षीस देण्यात आले. व काही संशोधन विद्यार्थ्यांनी फीडबॅक पण दिले या सत्रात प्रा.डॉ.तुकाराम मुंडे यांनी आपले सखोल विचार व्यक्त केले .यात एक दिवसीय चर्चासत्रावर त्यांनी प्रत्येक राज्याचे आपले मानव विकास अहवाल नियमित पूर्ण केले नाही याची त्यांनी खंत व्यक्त केली .प्रत्येक गावात मानव विकास निर्देशांकाची गरज असल्याचे सांगितले .तर या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. के.के .पाटील यांनी केले. यावेळी अर्थशास्त्र विभाग प्रमुख व राष्ट्रीय चर्चासत्र सेयोजक डॉ बालाजी सोबळे , शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. व्हि .आर भोसले, क्रीडा संचालक डॉ. आत्माराम टेकाळे व्यासपिठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ.एन .व्ही .जाधव यांनी मांडले हे चर्चासत्र. यावेळी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून प्राध्यापक, संशोधक, अर्थशास्त्र अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने राष्ट्रीय चर्चासत्रासाठी उपस्थित होते. यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी मोलाचे सहकारी केले.



जय शिवसंग्राम संघटनेची पुणे येथे बैठक संपन्न

आज दि.१९–०३–२०२४ मंगळवार रोजी पुणे येथे जय शिवसंग्राम संघटनेची पुणे पिंपरी चिंचवड मधिल असंख्य कार्यकर्त्यांचा जाहिर प्रवेश व विविध शेलच्या पदाधिकारी यांच्या निवडी करून नियुक्ती पत्र देण्यात आले.या वेळी जय शिवसंग्राम चे संस्थापक अध्यक्ष श्री रामहरी मेटे साहेब प्रदेश अध्यक्ष शुरेशराव शेटे ,युवक प्रदेश अध्यक्ष उमेश पाटील,आकाश जाधव, बाळासाहेब चव्हाण, पदाधिकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक संभाजीनगर,बीड,जालना,परभणी,लातूर,धाराशिव जनसामान्यांचे शस्त्र

मराठवाडा पत्र

संपादक : दशरथ सखाराम नरनाळे

बुधवार, दि. २० मार्च २०२४ पान 6

राज ठाकरे आणि अमित शाह यांच्यात बैठक

नवी दिल्ली,(वृत्तसंस्था):-मनसे आणि भाजप युतीच्या नव्या पर्वाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि भाजप नेते अमित शाह यांच्यात युती बाबत बैठक सुरू झाली आहे. राजधानी दिल्लीत या दोनही नेत्यांमध्ये बैठक सुरू आहे. यावेळी राज ठाकरे यांच्यासोबत त्यांचे पुत्र अमित ठाकरे आणि भाजप नेते विनोद तावडे उपस्थित आहेत. मनसेला किती जागा सोडल्या जाणार ? महायुती कशी असेल ? महायुतीत मनसेचं स्थान काय असेल ? आणि राज्यात मनसेचं स्थान काय असेल ? मनसे राज्यातील सत्तेत असेल की नाही ? याबाबतही या बैठकीत चर्चा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे या बैठकीकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे.

अंक वाटपासाठी मुले पाहिजेत

दैनिक मराठवाडा पत्रचे अंक वाटपासाठी मुले पाहिजेत. गरजुंनी प्रत्यक्ष भेटावे.

-------:: पत्ता ::--------

दैनिक मराठवाडा पत्र कार्यालय ,सहयोगनगर जालना रोड, बीड.

मो.: 9822152955

भोगलगावमध्ये विनापरवाना पुतळा बसवला

तलवाडा,(प्रतिनिधी) – गेवराई तालुक्यातील तलवाडा हद्दीतील भोगलगाव येथे सोमवारी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यात आला. सदरील पुतळा विनापरवाना बसवल्या प्रकरणी पोलीसांनी अज्ञात ५० ते ६० जणांविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत. तर दुसरीकडे ग्रामसेवकाच्या तक्रारीवरूनही ३३ जणांसह इतर १५ ते २० पुरूष, ३० ते ३५ महिला यांच्याविरूध्द गुन्हे दाखल झाले आहेत. एकाच प्रकरणात दोन वेगवेगळे गुन्हे प्रशासनाने दाखल केले आहेत.

पोलीस आणि ग्रामसेवकाच्या तक्रारीवरून दिडशे जणांविरुध्द दोन वेगवेगळे गुन्हे दाखल

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील भोगलगाव येथे सोमवारी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी अज्ञात ५० ते ६० – ईसमाने बेकायदेशीर मंडळी जमावून त्यांनी भोगलगाव येथे बसस्टँड जवळ छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळा लॉखडी चबुतरा बनवून त्यांच्यावर

बसवलेला दिसला व सदर जागा ही शासकीय असून तेथे अनाधीकृतपणे अतिक्रमण करून मा. जिल्हादंडाधिकारी बीड यांचे आदेशाचे उल्लंघन केले कोणीतरी अज्ञात ५० ते ६० ईसमांनी विना परवाना शासकीय जागेवर छत्रपती शिवाजी महाराजा चा पुतळा बसवलेला आहे.सपोनि सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी आसाराम दगडु मरकड ग्रामविकास अधिकारी

(ग्रामसेवक) रा.तलवाडा तालुका गेवराई, यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नंबर ५२ कलम ४२७,१४३,१४१,१८८, भादवी सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास चव्हाण हे करीत आहेत. तर याच प्रकरणात पोह विठ्ठल चव्हाण यांनीही फिर्याद दिली आहे. आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन लहान मुलांना पुढे करुन अडथळा निर्माण केला शासकीय आम्ही सार्वजनिक कार्य पार पाडत असतांना केला व कायदेशीर आदेश मा.नायब तहसिलदार सोनवणे, उपविभागीय पोलिस अधिकरी निरज राजगुरु, सपोनि सोमनाथ नरके ,यांनी त्याना वारंवार सांगुनही सदर ठिकाणी विनापरवाना बेकायदेशीर रित्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवलेला हाटवला नाही व लहान मुलांना पुढे करुन पुतळ्या पासुन व उउउ बाबात चिथावणी केली व जिल्हादंडाधिकारी बीड यांचे आदेशाचे उलगन केल्या प्रकरणीउल्लंघन केले. म्हणुन वरील नमुद लोकांविरुध्द भादवि कलम १४३,१४१,१८६,१८८ ,१५. १०९. भादवी सहकलम ८.३ कुर्गाईन ऑक्ट, महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ प्रमाणे ३७(१) (३) चे उल्लंघन चे १३५ प्रमाणे म्हणुन गुन्हा दाखल करुन पोउपनि भवर यांच्याकडे दिला आहे.सपोनि सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोह/ शिंदे यांचे कडे देण्यात आला.

१) गंगुबाई बाबुराव मडके २) तुळसाबाई मडके ३) गंगुबाई शिव्रित शिंदे ४) नंदा जाधव (मडक्याची मुलगी) सर्व भोगलगाव १) गंगाराम सदिपान कवें २) दत्ता विष्णु गायकवाड ३) जानेश्वर मुरलीधर गायकवाड ४) गोपाळ अभिमान कवें ५) मिठु डरपे ६) संतोष धोंडीबा कवे ७) सिद्देश्वर कल्याण मडके ८) रामेश्वर गोविंद मस्के ९) दिपक ज्ञानदेव घोडर १०) भानुदास काकासाहेब ढाळे ११) आशोक कल्याण मडके १२) गणेश अंकुश मडके १३) निवृत्ती पुंजाराम मडके १४) गणेश पराजी मडके १५) नारायण रामराव मडके १६) सचिन भाऊसाहेब मडके १७) महारुद्र गोविंद डरपे १८) बाळु मडके १९) ईश्वर भागवत मडके २०) पांडुरंग केशव मडके २१) आशोष राजेंद्र पुरी २२) संग्राम राजेंद्र पवार २३) मुकुंद मडके २४) बंडु जंगले २५) दत्ता गायकवाड २६) वैजिनाथ कचरु जाधव २७) शेख बशिर शेख २८) झिकिस्न दादाराव गायके सर्व रा. भोगलगाव २९) रोषन हाशे ३०) गोपाळ मनोहर शिंदे ३१) दत्ता हाशे सर्व तलवाडा ३२) आमर पुरी भोगलगाव ३३) विशाल चिकणे रा. गंगावाडी इतर अज्ञात १५ ते २० फुरुष ३० ते ३५ महिलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठेवीदारांच्या प्रश्नावर २७ मार्चला दंडुका मोर्चा- प्रा.उबाळे

बीड,(प्रतिनिधी):- आज उद्या, परवा आणि तेरवा कुणी टोकण देतंय तर कुणी आश्वासन पण आता खर्चा अथनि ठेवीदारांचा संयम संपला असून उद्याच्या २७ मार्च २०२४ रोजी आपण जिल्हाधिकारी कार्यालयावर दंडुका मोर्चा काढणार असून या मोर्चात मोठ्या संख्येने सर्व बँकेच्या ठेवीदारांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रा.सचिन उबाळे यांनी केले आहे. बीडच्या ज्ञानराधा मल्टीस्टेट मोंढा शाखेच्या बाहेर ठेवीदारांसोबत चर्चा करत असताना उबाळे यांनी ही माहिती दिली. दरम्यान याच वेळी ज्ञानराधाचे सर्वेसर्वा सुरेश कुटे यांनी सुध्दा उबाळेशी यावेळी मोबाईलवरून संपर्क केला.

बीड जिल्ह्यातील सहकाराचा पार विस्कुटा झाला आहे. गोरगरीब ठेवीदार सकाळी पाच वाजेपासून बँकांच्या दारात उभा आहेत. ज्ञानराधाच्या मोंढा शाखेबाहेर सोमवारी (दि.१८) सकाळपासुनच ठेवीदारांनी गर्दी केली होती. या ठिकाणी कोणीही कर्मचारी नसल्यामुळे लोकांनी गोंधळ केला. याची माहिती मिळाल्यानंतर प्रा.सचिन उबाळे यांनी या ठिकाणी धाव घेतली आणि त्यांना शांत करत धीर दिला.यावेळी बोलताना प्रा.उबाळे यांनी सर्वच बँकांचे वाभाडे काढले. ज्ञानराधा, साईराम, जिजाऊ, राजस्थानी, मराठवाडा अर्बन (माजलगाव), परिवर्तन, मातोश्री या बँकांना पत्रावाच्या काय अमेरिकेतून मिळाल्या आहेत का ? प्रशासनाचा यांच्यावर कसलाच वचक नाही. मी सर्वसामान्य घरातुन आली आहे. मला सर्व प्रश्नांची जाण आहे त्यामुळे मी तुमच्यासाठी लढतो आहे. परंतु बीड जिल्ह्यातील कुठलाच पुढारी तुमच्यासाठी आला नाही असे सांगत सर्वच बँकांच्या विरोधा प्रचंड घोषणाबाजी केली. या सर्वांच्या विरोधात पुन्हा एकदा आपण एकत्र येणार असून बीड जिल्हा आणि मराठवाड्यातील ठेवीदारांनी उद्याच्या २७ तारखेला बीडमध्ये येणे गरजेचे आहे. घरी बसून तुमचे पैसे मिळणार नाहीत. २७ मार्च २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातुन दंडुका मोर्चा काढण्यात येणार आहे. सदरील मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार असून माझा अंगात रक्तचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी तुमच्या हक्कासाठी लढणार आहे त्यामुळे तुम्ही मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावी असे आवाहन प्रा.उबाळे यांनी यावेळी केले.दरम्यान कुटे ग्रुपचे सर्वेसर्वा सुरेश कुटे यांनी प्रा.सचिन उबाळे यांच्याशी मोबाईलवरून संपर्क केला. माझे कर्मचारी चांगल्या काळात माझ्या सोबत होते परंतु आता वाईट काळामध्ये त्यांनी मला साथ दिली पाहिजे असे मी त्यांना सांगितले आहे. आज सकळीच सर्वांशी बोलनी आहे. मी पंढ्र उपलब्ध केला आहे तो सर्वांना व्यवस्थीत देण्याबाबत सर्वांचं सहकार्य अपेक्षीत असल्याचंही यावेळी कुटे म्हणाले.

सराफा व्यापाऱ्याला लुटणाऱ्या टोळीला पोलिसांनी पायी पाठलाग करून पकडले

तिघांच्या मुसक्या आवळल्या; सपोनि नरके यांच्यासह टिमची कामगिरी

तलवाडा, (प्रतिनिधी):-गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील केंकतपागरी शिवारातील हिवरा रोडवरुन सराफा व्यापारी जात असताना चार ईसमानी स्कार्पिओचा धक्का देऊन महामुनी सराफा व्यापाऱ्याला घार इसमांनी लुटल्याच्या घटनेची माहिती तलवाडा पोलिस ठाण्याचे सपोनि सोमनाथ नरके, यांना मिळताच पोलिसांनी पाठलाग करून तासाभरात तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या तर एक फरार होण्यास यशस्वी झाला. आज सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी ही कामगिरी बजावली.

याबाबद सविस्तर माहिती अशी की, व्यापारासाठी सराफा व्यापारी तलवाडा परिसरातील केंकतपागरी शिवारातील

हिवरा रोडवरुन जात असताना रस्त्यातच चार चोरटे त्यांचा धवा धरुण बसले होते. त्यांना हत्याराचा धाक दाखवून त्यांच्याकडील लाखों रूपये किंमतीचे सोने,चांदी यासह रोख रक्कम पोबारा करण्यात यश आले संबंधीत व्यापारी याने तात्काळ तलवाडा पोलिसांना याबाबद माहिती दिली तसेच तलवाडा पोलिस ठाण्याचे सपोनि सोमनाथ नरके यांनी काही तासांतच तपासाचा चक्र फिरवली. मनुबाईजवळा येथील गायकवांचे मदतीने तलवाडा पोलीसानी चोरांचा एक किलो मिटर पायी पाठलाग करुन चोरांच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनी आरोपी शिवदत्त रामराव सोंळूखे (राहणार गेवराई), रामचंद्र रंगानाथ गांगुर्डे (राहणार अंबड), नितीन जोगदंड (रा.नाकझरी), तीन आरोपींना पकडले असून एक आरोपी फरार झाला आहे. तसेच स्कार्पिओ ताब्यात घेतली आहे.तलवाडा पोलिस स्टेशनचे सपोनि सोमनाथ नरके,सह गोपनीय शाखेचे विठ्ठल चव्हाण, पोह चालक बागलाने, यांनी कारवाई केली आहे.आरोपी ताब्यात घेऊन गेवराई पोलिसांचे ताब्यात दिले असल्याची माहिती सपोनि सोमनाथ नरके यांनी दिली आहे.

बीड शहरातील नुतन शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

बीड, प्रतिनिधी – वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मुख्यमंत्री मा.ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आदेशानुसार व युवासेना प्रमुख तथा खासदार मा.श्री.श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, मराठवाडा संपर्क नेते माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. विजय पाटील,बीड विधानसभा संपर्कप्रमुख बापू मोरे यांच्या सूचनेवरून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक यांच्या आदेशानुसार तसेच शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांच्या शिफारशीनुसार बीड शहरातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या काल दि. १८ मार्च रोजी दु १.०० वाजताच्या दरम्यान नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये नवनाथ सुखदेव शिंदे –

शहर संघटक, गणेश दत्तराव राऊत– उपशहर प्रमुख, हनुमानप्रसाद गोकुळप्रसाद पांडे – उपशहर प्रमुख, प्रमोद (बंटी) सुशील घनवे – उपशहर प्रमुख, अनिकेत अंकुशराव नाटकर – उपशहर प्रमुख, गणेश दावजीबा भांडवले – उपशहर प्रमुख, आकाश सदाशिवराव वडमारे – विभाग प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली. यादरम्यान वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवणीचा सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार करून शिवसेना पक्ष वाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करात असा विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप व सचिन मुळुक यांनी व्यक्त केला असून नव्ये नियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच शिवसेना नेते शिंदे साहेब यांनी शब्दाचा मान देऊन माझ्या अनेक वर्षांच्या विश्वासातील सहकारी मित्रांवर पक्षाची विश्वासने जिम्मेदारी सोपवली असे म्हणत अनिलदादा जगताप यांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले व नवं नियुक्त शिवसेना पदाधिकाऱ्यांचं स्वागत केले.

प्रभाकर हरके यांचे निधन

बीड, (प्रतिनिधी):-प्रभाकर मन्मथअप्पा हरके यांचे मंगळवारी पहाटे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आज वीरशैव लिंगायत स्मशानभुमी, कंकालेश्वर मंदिराच्या पाठीमागील परीसरात अंत्यसंस्कार करण्यात आले असुन मृत्यूसमयी ते ८२ वर्ष वयाचे होते.पेठ बीड भागातील हरके गुरुजी नावाने परिचित होते. अत्यंत मनमिळावू, शिस्तप्रिय, धार्मिक व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हरके कुटुंबियांच्या दुःखात सायं.दै.सिटीझन परिवार सहभागी आहे.



चौसाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी प्रमोद रूपवते

चौसाळा, (प्रतिनिधी):- प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त भिमनगर चौसाळा येथील बुद्ध विहारात बापु पवार . किशोर ढोकणे . प्रविण सोनवणे . रोहन चव्हाण . रोहित जावळे प्रकाश ढोकणे . यांच्या प्रमुख उपस्थितीत दि . १६ मार्च २०२४ वार शनिवार रोजी रात्री ८: ३० वाजता बैठक संपन्न होवून सार्वजनिक जयती उत्साहाची कार्यकारणी सर्वानूमते एकमताने खालील प्रमाणे ठरवण्यात आली . अध्यक्षपदी प्रमोद रूपवते, उपाध्यक्ष पवन घोडके, सचिव वसंत चव्हाण, सहसचिव बबन पवार तर कोषाध्यक्षपदी रविंद्र पवार यांची निवड करण्यात आली.



यावेळी आविनाश वाघमारे . पंकज रूपवते . माणिक चव्हाण . आनंतराव घोडके . आशोक चव्हाण . कुमार पवार . लखन वाघमारे . राजेंद्र रूपवते . गौतम रूपवते . आमोल जावळे . सागर चव्हाण . अशोक सिरसाळे . अमोल चव्हाण . साहिल चव्हाण . विजय जाधव . सुमित चव्हाण . विजय चव्हाण . दिपक म्हस्के . विजय जाधव . विजय रूपवते . किशोर वाघमारे . सागर पवार . यांच्यासह महिला मोठ्या सख्येने उपस्थित होत्या . यावेळी खालील प्रमाणे कार्यक्रम एकमताने ठरवण्यात आले . दि . १४ एप्रील रोजी सकाळी ९ : वाजता झेंडावंदनाचा कार्यक्रम होईल . दि . २८ एप्रील रोजी भिमगीताचा भिमनगर येथे कार्यक्रम होवून दि . २९ एप्रील रोजी विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक भिमनगर येथून ५: ३० . वाजता निघेल .

राजकीय पक्ष व नागरिकांनी आचारसंहितेचे पालन करावे - उपजिल्हाधिकारी लाटकर

५० टक्के मतदान केंद्रावर वेब कॅमेरे ठेवणार नजर

परळी (प्रतिनिधी):- ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी १३ मे २०२४ रोजी होणाऱ्या निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी व विविध पक्षांनी केंद्रीय निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या आदर्श आचारसहिंतेचे पालन करावे असे आवहान सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा परळी उपविभागीय अधिकारी अमोल लाटकर यांनी केले.ते निवडणूकी संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांशी बोलत होते. दरम्यान मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ५० टक्के मतदान केंद्रावर प्रथमच वेब कॅमेरे बसविण्यात आले असून १३ मे रोजी होणाऱ्या मतदानवर करडी नजर ठेवली जाईल. यावेळी त्यांनी ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर २३३ परळी विधानसभा मतदारसंघातील तयारीचा माहिती दिली.परळी विधानसभा मतदारसंघात लोकसभेसाठी होणाऱ्या निवडणुकीत ३२३२७३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत .यामध्ये एक लाख ६९ हजार २४४ पुरुष तर एक लाख ५३ हजार ५३० महिला आणि ३ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीसाठी परळी विधानसभा मतदारसंघात एकूण ३४२ मतदान केंद्र निर्माण करण्यात आले आहेत .परळी तालुक्यात १६५ परळी शहरात ८२ तर अंबाजोगाई तालुक्यात १०० मतदान केंद्रांचा समावेश आहे .निवडणूक लक्ष ठेवण्यासाठी २९ विविध पथके तैनात करण्यात आले आहेत .१,४४० अंगे मतदार तर ८५ वर्षपुढील मतदारांची संख्या ९,९१३ आहे सशुं निवडणुक प्रक्रिय खुळीत पार पाडावे यासाठी ३६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे नेमणुक करण्यात आल्याचेही लाटकर यांनी सांगितले.

डोंगरी विभागातील गावकऱ्याच्या वतीने माजी मंत्री क्षीरसागर यांचा सत्कार

बीड (प्रतिनिधी):- डोंगरी विभाग अंतर्गत बीड मतदार संघातील अनेक गावे समाविष्ट झाल्यामुळे सोमवारी आठ गावच्या ग्रामस्थांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन सत्कार करत आनंद व्यक्त केला.

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बीड(३९) आणि शिरूर तालुक्यातील(१२) म्हणजेच बीड मतदार संघांतर्गत वेणावां एकूण ५१ गावांचा डोंगरी विकास विभागाच्या अंतर्गत समावेश करुन घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला त्यामुळे ही गावे डोंगरी विकास विभागाच्या अखत्यारीत आले आहेत. यामुळे या गावांना मोठ्या प्रमाणात फायदे होणार आहेत बंधार्‌यच्या कामांमध्ये कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, लघुपाटबंधारे ची कामे, उपसा जलसिंचन योजना मिळणार आहेत तसेच रस्त्याच्या कामात लहान रस्ते, मिसिंग लिंक, छोटे पूल, तीन किलोमीटर लांबीचे रस्ते, नळकांडी पूल, रस्त्याबरील नालीची कामे, फरशी बांधणे अशी अधिक कामे होतील. पाणी पुरवठ्याच्या कामांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या लहान-लहान योजनांचा फायदा या गावांना होणार आहे. तसेच या गावांना इंधन विहीरी, समाज मंदिर, एसटी

बस थांबे आणि शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना फीस मध्ये सवलत, शैक्षणिक आरक्षण आणि नोकरीत आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दि.१८ रोजी सुर्यांचीवाडी, ढेकणमोहा, पिंपळवाडी, भवानवाडी, कारळवाडी, निर्मळवाडी, भाळवणी, देवबांचीवाडी आदि गावच्या ग्रामस्थांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या कार्यालयात येऊन त्यांचा सत्कार करून समाधान व्यक्त केले आहे.यावेळी विलास बडगे, अर्जुन बहिरवाळ, संग्राम गुंड, श्रीरंग खटणे, मधुकर पाटील, कहुमाई शेख, रईसोद्दीन शेख, बबनराव डोंगर, कुंडलिक धसे, बाबुराव पाटील, उत्तम खटाणे, संजय बहिरवाळ, गणेश भंडाणे, बापूराव पाटील, महेश दहे, दिलीप डोंगर, बाळू दहे, बाळू कळसाने, सतीश कळसाने, रामनाथ खटाणे, राजू साळवे, उद्धव कळसाने, केशव नहिराळे, वसंत नहिराळे व पिंपळवाडी, भाळवणी गावचे ग्रामस्थ आणि ढेकणमोहा येथील बालाप्रसाद जाजू, नागेश शिंदे, रामा भोगे, नारायण देवकते, परमेश्वर थापडे, प्रभू सिंह ठाकुर, सतीश देवकते, श्रीकिशन देवकते, दिलीप देवकते, मनोज देवकते, आनंद कराडे तसेच सरपंच सुंदर ढवळे, आजिनाथ आदमाने, हनुमान सुर्वे, नानाभाऊ मस्कर, ऋषिकेश सुर्वे, सुशेन भांडवलकर, बिबीशन भांडवलकर, संजय मस्के, शंकर बायकर, रमेश भांडवलकर, सतीश भांडवलकर, ईश्वर भांडवलकर, बाळासाहेब मस्कर, हनुमान मोरे आदी उपस्थित होते.

नुतन शिक्षणाधिकाऱ्यांचा शिक्षक संघटनेच्या वतीने सत्कार संपन्न

बीड (प्रतिनिधी): रोजी आदर्शनगर (परळीवेस) बहुजन शिक्षक संघ (इब्टा) जिल्हा शाखा बीड च्या वतीने शिक्षणाधिकारी प्राध पदी नव्याने रूजू झालेले मा. श्री भगवानराव फुलारी साहेब यांचा इब्टा शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष अनिल विद्यागर , उपाध्यक्ष सतिष चिंचकर , जानिराम कुरुंद , सहसचिव सोमिनाथ दौंड, बाळू शिंदे , कार्याध्यक्ष सुनिल बेडे यांच्या हास्ते शाल पुष्पगुच्छ देवून स्वागतपर सत्कार करण्यात आला .



प्रथम संघटनेच्या वतीने सर्व पदाधिकाऱ्यांचा परिचय करुन देण्यात आला त्यानंतर संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष अनिल विद्यागर यांनी आपले मनोगत व्यक्त केले . सत्काराला उत्तर देताना मा. फुलारी साहेब यांनी संघटनेच्या विद्यायक कामाला वेळोवेळी सहकार्य केले जाईल . संघटनेच्या माध्यमातुन शिक्षकांचे विविध प्रश्न प्राधान्य क्रमाने सोडवले जातील . असे अश्वासन दिले. सदरील छोटेखानी सत्कार कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सतिष चिंचकर यांनी तर अभार प्रदर्शन जानकिराम कुरुंद यांनी केले . सत्कार प्रसंगी संघटनेचे सहसचिव – बाळू शिंदे , बालासाहेब मंदे, गणेश दळवी उपाध्यक्ष –अनिल गायसमुद्रे, बापू खंदारे ,बीड तालुका अध्यक्ष –सुषेन भोसले, गेवराई तालुकाध्यक्ष –विकास घोडके , संघटक – बाबासाहेब साळवे , सह कार्याध्यक्ष –सतिष पवार , मार्गदर्शक – सुहास साळवे ,मुरलीधर अभंग, बाळू डोंगरे , गोरक्षनाथ काळे, भारत आमटे, उल्हास बडे , शहादेव शिंदे , सुरेश गुजर , सदिप तांबट, बिभिषेण शेळके , पांचाळ सर इ.संघटनेचे पदाधिकारी सभासद उपस्थित होते .

पाणी शुद्धतेची तपासणी करणार कोण ?

पाडुड (प्रतिनिधी); प्रत्येक लग्नकार्यातच नाही, तर कुठलाही कार्यक्रम असो पिण्यासाठी थंड पाण्याचे जार आणले जातात. तप्त उन्हात पाणी थंड लागते म्हणून लोक गटागटा पितात. मात्र, त्याच्या शुद्धतेची हमी काय ? याचा कोणीही विचार करीत नाही. त्यामुळे थंड पाणी पिल्यावर घशाचे आजार होऊ लागले आहेत. मात्र कार्यक्रमात जारचे पाणी वापणे बंद न होता ते अविभाज्य झाले आहे. लग्नकार्य व इतरही कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात जारच्या थंड पाण्याचा वापर होतो. अलीकडे अनेकांच्या घरीही थंड पाण्याचा जार शुद्ध पाणी म्हणून आणल्या जातो. या पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मात्र, पाणी शुद्धतेची हमी कुणालाही घेता येत नाही. जार विक्रणारे व्यावसायिक ते पाणी शुद्ध असल्याचे सांगतात. मात्र, त्याची शुद्धता तपासणारी यंत्रणा कुठेही उपलब्ध नाही. त्यामुळे नाइलाजाने का होईना ते पाणी पिण्याची वेळ सर्वांवर आली आहे. १८ ते २० लिटरचा पाण्याचा जार ३५ ते ४० रुपयेला मिळतो, या पाण्याची उन्हाळ्यांच्या दिवसात मोठी उलाढाल होते. यायबरोबर बाटलीबंद पाण्यालाही सुगीचे दिवस येतात.

आठ ते दहा रुपयाला मिळणारी पाण्याची बाटली २० रुपयाला विकली जाते. शुद्ध पाणी म्हणून प्रवासात इतर पाणी न पिता लोक आवडीने ही बाटली घेत आपापली तहान भागवितात. काही ठिकाणी प्रवास करताना हे २० लिटरचे जारही दीग लावून विक्रीसाठी उपलब्ध असतात. बाटलीबंद पाणी व जारचे पाणी किती शुद्ध आहे.याबाबत कुणाला काहीच माहिती नसते. हे सत्य असले तरी लोक थंड पाणी म्हणून आवडीने घेऊन आपली तहान भागवितअसतात.